# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, जुना पुणे - बेंगलोर महामार्ग, कृषी महाविद्यालयासमोर, कोल्हापूर – ४१६००४

दुरध्वनी क्र. (०२३१)२५२१०३८ फॅक्स क्र. २५२१०१६ gpkolhapur@yahoo.com

---

**कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे उपक्रम अंतर्गत**

## दिव्यांग ( अपंग ) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष २०२०-२१ अभियांत्रिकी पदविका प्रवेश

## अंतिम फेरी

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य - ०५, यंत्र - ०५, विद्युत - ०५, औ.अणुविद्युत - ०५, माहिती तंत्रज्ञान - ०५ अशा एकूण २५ जागेसाठी इयत्ता १० वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. सदरहू प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यास एस.एस.सी. परिक्षेत किमान ३५% गुण आवश्यक आहेत. तसेच किमान ४०% दिव्यांग (अपंग) असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश नियमावली प्रमाणे व संस्थेमध्ये व्ही. आर. सी. मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणा-या वैद्यकिय चाचणीनुसार देण्यात येईल. या योजने अंतर्गत प्रवेशार्थीस शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह, भोजन भत्ता, पुस्तके व. स्टेशनरी साठी भत्ता इत्यादी सोयी सवलती केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांनी **दि.०५/०१/२०२१** वैद्यकीय चाचणी व अंतिम प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेत मुळ कागदपत्र **(इ.८,९,१० वि.गुणपत्रिका, शाळा सोडलेचा दाखला, अपंगत्वाचा दाखला,जातीचा दाखला. उत्पन्नाचा दाखला इ.)** व शुल्क (अंदाजे रू. **२५००**/-) सह सकाळी ११.०० वाजता हजर रहावे.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर